


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३०१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१२ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## एसटी कर्मचाऱ्यांसाठी मोठा निर्णय, मंत्री सरनाईक यांची घोषणा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, मुंबई :** महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेचं आणि एसटीचं अनोखं असं नातं आहे. ग्रामीण महाराष्ट्राची वाहतूक आणि दळवळण सुविधा आजही एसटीवर अवलंबून आहे. गाव आणि तालुक्याला जोडण्यात एसटीचा अतिशय मौल्यवान असा वाटा राहिलेला आहे. हा वाटा आजही तसाच आहे. आजही लाखो नागरिक एसटीने प्रवास करतात. एसटी ही आजही अनेक तालुक्यांची लाईफलाईन आहे. ग्रामीण भागाची जनता आजही एसटीने दररोज प्रवास करते. तसेच शहरात देखील परिवहन विभागाच्या शहरी बसेस तितक्याच महत्त्वाच्या भूमिका बजावतात. एसटी महामंडळात लाखो प्रवाशांसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचं योगदान देखील मोठं आहे. या कर्मचाऱ्यांना खूश करणारा निर्णय राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे. प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत याबाबत घोषणा केली आहे.



**प्रताप सरनाईक यांची घोषणा काय?**

एसटी कर्मचाऱ्यांना ५८ टक्के महागाई भत्ता दिला जाईल, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांप्रमाणेच एसटी कर्मचाऱ्यांना ५३ टक्क्यांवरुन ५८ टक्के महागाई भत्ता देण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. त्याचबरोबर एसटी कर्मचाऱ्यांची जवळपास १०० कोटींची थकबाकी होती. ती सुद्धा देण्याचा निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत मी या संदर्भात चर्चा केली. या चर्चेत त्यांनी या निर्णयाला सकारात्मक प्रतिसाद दिला, अशी प्रतिक्रिया प्रताप सरनाईक यांनी दिली.

मी मुख्यमंत्र्यांना निवेदन देणार आहे. एसटी महामंडळाची जी काही थकबाकी आहे, आमच्यावर जो काही आजपर्यंतचा बोझा आहे तो कमी करण्यासाठी वित्त विभागाने सहकार्य करावं, असं प्रताप सरनाईक म्हणाले.

**प्रताप सरनाईक काय-काय म्हणाले?**

अडचणींवर मात करुन पुढे जायचं असतं. सध्याच्या परिस्थितीत काहीही अडचणी येणार नाहीत. आम्ही उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करत आहोत. सकाळी साडेदहा वाजेपासून ते दुपारी दीड वाजेपर्यंत आम्ही उत्पन्न वाढीवरच चर्चा केली. उत्पन्न वाढीसाठी जे लॉसमध्ये असलेले रुट आहेत ते बंद करावेत, तिथे कमी बसेस करावेत. नुकसानीचं रुपांतर ना नफा आणि ना तोटा यात कसं होईल? याबाबत खबरदारी घेणं आवश्यक आहे. पर्यटनासाठी बसेस उपलब्ध करुन देणं जेणेकरुन उत्पन्नात वाढ होईल, अशी भूमिका प्रताप सरनाईक यांनी मांडली.

मी पहिल्या टप्प्यात २६४० एसटी पहिल्या टप्प्यात दिलेल्या आहेत. दुसऱ्या टप्प्यात ३ हजार बसेस पैकी १५० बसचे वितरण झाले आहे. लवकरच ८०० ते ९०० बस येणार आहेत. राज्याच्या कानाकोपऱ्यात या एसटी पोहोचवण्याचं काम आम्ही करतोय. या गाड्यांचे वितरण दिवाळीपर्यंत पूर्ण होईल. प्रत्येक आगारासाठी किती बस द्यायच्या याची सूचीसुद्धा केलेली आहे. ते वितरण संपलं की, ५००० बसेसचे विचरण करणार आहोत. यामुळे बाहेरच्या गाड्यांची आवश्यकता लागणार नाही. २०२७ नंतर आम्ही पूर्ण ईव्ही वेहिकल घेणार आहोत. भविष्यात प्रवाशांना आहे त्या तिकीटात एसी गाड्यांची सुविधा मिळावी, अशा सूचना देखील मी दिलेल्या आहेत, अशी माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली.

## सोलापुरातील दोघांचा तेरामैल जवळ मोटरसायकल वरून पडून मृत्यू

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.११, सोलापूर :** सोलापूर विजयपूर महामार्गावरील तेरामैल जवळच्या रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ भरधाव मोटरसायकलवरून सोलापूरच्या दिशेने निघालेले दोघेजण छोट्या पुलावरून खाली पडून गंभीर जखमी झाले. यामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला तर दुसऱ्याचा सोलापूरला उपचारासाठी घेऊन जाताना मृत्यू झाला. हा अपघात आज गुरुवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडला.

विजय गोकुळसिंग लंगडेवाले (वय ५२) राहणार हुच्चेश्वरनगर, कुमठा नाका, सोलापूर व श्याम सिद्राम भोसले (वय ५७) भिमाई नगर, माशाळ वस्ती, सोलापूर असे या अपघातात मृत्यू झालेल्या दोघांची नावे आहेत.

मंद्रुप पोलीस ठाण्यात या अपघाताची नोंद झाली आहे. याबाबतची माहिती अशी की, विजय लंगडेवाले व श्याम सिद्राम भोसले हे दोघेजण मोटरसायकल (एम एच १३ ई यु ४०९५) वरुन सोलापूरहून टाकळी येथे एका बांधकामाचे काम पाहण्यासाठी गेले होते. तेथील काम पाहून परत सोलापूरकडे येत असताना नांदणी टोल नाका ओलांडून ते पुढे आले. तेव्हा भरधाव वेगातील मोटरसायकलसह दोघेही रिलायन्स पेट्रोल पंपाच्या अलीकडे असलेल्या एका छोट्या पुलावरून खाली पडले. यामध्ये दोघांच्याही डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने ते बेशुद्ध पडले. गंभीर जखमी झाल्याने विजय लंगडेवाले यांचा जागीच मृत्यू झाला. तर श्याम भोसले याचा उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात घेऊन जाताना मृत्यू झाला.

या अपघाताची माहिती मिळतात पोलीस निरीक्षक शंकर पटवारी, ग्रेड पीएसआय संदीप काशीद, पोलीस संदीप काळे व माजिद शेख हे घटनास्थळी गेले. त्यांनी महामार्गावरील ॲम्बुलन्स मधून जखमी भोसले यास उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात पाठविले. तर जागीच मृत्यू झालेले विजय लंगडेवाले यांचा मृतदेह मंद्रुपच्या ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविला.

लंगडेवाले यांच्या पश्चात पत्नी दोन मुले, एक मुलगी व पाच भाऊ असा परिवार आहे. मंद्रूप पोलीस ठाण्यात या अपघाताची नोंद झाली असून अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## अवैध मद्यपान अड्ड्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाची धाड

### एकूण ११,६३, ४६० किमतीचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने बुधवार दि. १० जूनला हॉटेल बजेट, जुनोना चौक, बाबुपेठ येथे सुरु असलेल्या अवैध मद्यविक्री व मद्यपान अड्ड्यावर झाड टाकून मोठी कारवाई केली. सदर ठिकाणी परवानगीशिवाय मद्यविक्री करुन ग्राहकांना मद्यपान व खाद्यपदार्थांची व्यवस्था उपलब्ध करुन देत असल्याचे आढळून आले.

कारवाईदरम्यान एकूण ११ ग्राहक आशिष भसारकर, संपत कडम, रमेश भंडारी, रवि पत्तीवार, रामलू भंडारी, उमेश गाडगे, राजू साळवे, विठ्ठल निब्रड, विक्की मडावी, प्रभाकर कोवे, मुकेशकुमार गुप्ता हे प्रत्यक्ष मद्यपान करताना आढळून आले. तसेच चुन्नू विजयपालसिंग परमार (मॅनेजर) हा ग्राहकांना मद्यपानासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरवित असल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी संबंधितांविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम ६८ व ८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान ताब्यात घेण्यात आलेल्या सर्व ११ ग्राहकांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून, संबंधित वैद्यकीय अहवालामध्ये त्यांनी मद्यप्राशन केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे संबंधितांविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमांतर्गत पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. अवैध मद्यपान अड्ड्याचा संचालक/ हॉटेल मालक आशिष चांदेकर हा कारवाईदरम्यान फरार झाला असून त्याचा शोध घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तास अटक करण्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत.




**जप्त केललेला मुद्देमाल :**

या कारवाईत २३०२० रुपये किंमतीची दारु व कॅाऊंटरवर असलेली १३०४० रुपये रोख रक्कम कारवाईवेळी जप्त करण्यात आली. याव्यतिरिक्त दोन कुलर्स, गोदरेज ब्ल्यू स्टार, व्होल्टास कंपनीचा फ्रीजर, इतर स्वयंपाकासाठी वापरण्यात येणारी भांडी व इतर साहित्य यांची एकूण किंमत १ लक्ष २७ हजार ४०० रुपये असून, रोख रक्कम व मद्यसाठ्यासह एकूण ११ लक्ष ६३ हजार ४६० रु किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## इंद्रायणी नदी घाटावर इंद्रायणी आरती... भाविकांची माऊली मंदिरात दर्शनास गर्दी...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, आळंदी :** श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी यांचे वतीने मंदिरातील एकादशीचे दिनी परंपरे प्रमाणे विविध धार्मिक कार्यक्रम झाले. श्रींचे गाभाऱ्यात लक्षवेधी पुष्प सजावट करण्यात आली होती. मंदिरात श्रींचे दर्शनास भाविकांची गर्दी झाली होती. मात्र मंदिरातील दर्शन बारी नियोजन व्यवस्थित नसल्याने मंदिर परिसरात भाविकांना गैरसोयीस सामोरे जावे लागले. नाहक चेंगरा चेंगरी आणि काही भाविकांनी मंदिरात प्रवेश करण्यासाठी संताप व्यक्त केला. दर्शनाबारीचे नियोजन फसले. मंदिरातील अनेक दरवाजे बंद केल्याने भाविकांनी नाराजी व्यक्त करीत स्थानिक नागरिकांना कळविले. यावर संबंधित ठिकाणी पोलिस प्रशासनाचे, महसूल प्रशासनाचे सांगण्यावरून पुन्हा दरवाजे खुले करण्यात आले. आळंदीतील इंद्रायणी नदी घाटावर परंपरेने कीर्तन सेवा हरिनाम गजरात झाली. इंद्रायणी आरती सेवा समितीचे वतीने इंद्रायणी आरती उत्साहात झाली. यावेळी संयोजिका अनिता झुजम, अनिता शिंदे, सुवर्णा काळे, गोविंद ठाकूर, संयोजक अर्जुन मेदनकर आदी उपस्थित होते. समस्त ग्रामस्थ आळंदीकर यांचे वतीने कीर्तन परंपरेचा असलेला एकमेव फड म्हणजे वैकुंठवासी गुरुवर्य मारुती बुवा गुरव आळंदीकर हा किर्तन परंपरेचा फड आहे. या फडावर गेल्या शंभर वर्षा पासून दर वदय एकादशीला कीर्तन सेवा होत. या फडावर अनेक मोठ मोठे कीर्तनकार यांची कीर्तन सेवा रुजू झाली आहे. यात हभप रंगनाथ महाराज परभणीकर, हभप धुंडा महाराज देगलुरकर, हभप किसन महाराज साखरे, हभप वक्ते महाराज बाबा आदी नामवंत कीर्तनकार यांच्या नावांचा समावेश होता. फडावरील ही परंपरा आजता गायत आळंदीत निरंतर चालू आहे.

कमला एकादशी दिनी देखील सेवा रुजू झाल्याचे वंशज संकेत वाघमारे यांनी सांगितले. कमला एकादशी दिनी इंद्रायणी सेवा समिती आळंदी यांचे इंद्रायणी आरती पूर्वी देवतळे ऋषीकेश किर्तनकार यांची कीर्तन सेवा रुजू झालीं. यावेळी वादक कृष्णा महाराज घंगाळे, गायक करण महाराज पाटील पंढरपुरकर यांनी साथ दिली. इंद्रायणी नदी घाटावर आळंदी देवस्थान तर्फे आयोजित इंद्रायणी आरती इव्हेंट उत्साहात झाला. या वेळी पिंपरी चिंचवड महापौर रवी लांडगे, देवस्थानचे विश्वस्त ॲड.राजेंद्र उमाप, रोहिणी पवार, निलेश महाराज लोंढे, योगी निरंजन नाथ, पुरुषोत्तम महाराज पाटील, व्यवस्थापक माऊली वीर आदी मान्यवर उपस्थित होते. आळंदी देवस्थानला खासदार संजय उर्फ बंडू जाधव यांनी रुग्णवाहिका भेट दिली. यावेळी डॉ.राम गावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची विटंबना प्रकरणी आरोपीचा शोध सुरू

### माहिती देणाऱ्यास ११ हजारांचे बक्षीस

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.११, राहुरी :** राहुरी तालुक्यातील ब्राह्मणी बाबा तालीम परिसरात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्याची विटंबना करणाऱ्या अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी राहुरी पोलिसांनी नागरिकांना पुढे येण्याचे आवाहन केले आहे. आरोपीबाबत खात्रीलायक माहिती देणाऱ्या व्यक्तीस ११ हजार रुपयांचे रोख बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २६ मार्च २०२५ रोजी दुपारी सुमारे ३.३० वाजण्याच्या सुमारास अज्ञात इसमाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्याला काळा रंग लावून विटंबना केली होती. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली होती. याप्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३६९/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १९६, २९९ व ३५३(३) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




घटनेनंतर राहुरी पोलिसांकडून विविध स्तरांवर तपास सुरू असून आरोपीचा शोध घेण्यासाठी तांत्रिक तसेच गुप्त माहितीच्या आधारे तपासाची चक्रे फिरवली जात आहेत. मात्र अद्याप आरोपीचा ठावठिकाणा लागलेला नसल्याने पोलिसांनी जनतेची मदत मागितली आहे.

या प्रकरणातील आरोपी अथवा त्याच्याबाबत कोणतीही माहिती असलेल्या नागरिकांनी राहुरी पोलिस ठाणे किंवा तपास अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस निरीक्षक संजय आर. ठेंगे यांनी केले आहे. माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचेही पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

आरोपीबाबत उपयुक्त व खात्रीलायक माहिती देणाऱ्यास रु. ११,००० चे रोख बक्षीस देण्यात येणार असून नागरिकांनी या तपासात सहकार्य करून आरोपीस जेरबंद करण्यास मदत करावी, असे आवाहन राहुरी पोलिस स्टेशनकडून करण्यात आले आहे.




## उष्माघाताचे वाघबळी

सूर्याचे विदर्भावर जरा जास्तच प्रेम दिसते. दर उन्हाळ्यात हा भाग ताप ताप तापतो. गमतीने म्हटले जाते की, विदर्भ हे सूर्याचे आजोळ आहे. उन्हाळ्याच्या सुटीत तो आजोळी येतो. त्यामुळे इकडे चटके जरा जास्त बसतात. गमतीचा भाग सोडला, तरी विदर्भ तापतोय हे खरेच आहे. इतक्या प्रखर उन्हात कोणता भाचा विदर्भातील मामाकडे उन्हाळ्याच्या सुटीत येईल? उन्हाला सगळे घाबरतात. गेली अनेक दिवस जगातील उष्ण गावांची यादी जाहीर होत होती, त्यात विदर्भातील दोन-तीन गावे तर राहतच होती. कधी कधी ती अग्रभागी असत. प्रशासनाने केलेल्या सूचना, दिलेल्या सुविधांनंतरही उष्माघाताने माणसांचे बळी जात. यात मजूर, कामगारांची संख्या अधिक असे. काही नोंदविलेली, काही न नोंदविलेली.

या वेळी सगळा महाराष्ट्र तापला. विदर्भ जरा जास्त तापला. हा भाग कर्कवृत्ताच्या जवळ आहे. सूर्याची किरणे थेट जमिनीवर येतात. सूर्य रोहिणी नक्षत्रात प्रवेश करतो, तेव्हा ते अधिक थेट येतात. 'नवतपा' अधिकच तापतो. येथून जवळ समुद्र नाही, त्यामुळे थंड वारे येत नाहीत. उत्तर पश्चिमेकडून येणारे वारे कोरडे असतात. त्यामुळे उन्हाचा तडाका जास्त जाणवतो. हिरवळीचे कमी होणे, काँक्रिटीकरण, घरोघरी लागलेले एसी ही शहरी उष्णतेची कारणे सांगितली जातात. पण मग जंगलांचे काय? तिथे तर मोठी हिरवळ आहे. झाडे आहेत. पाणी आहे. तिकडेही उष्णता वाढली की काय? कारण काही तज्ज्ञ जंगलातील पशुपक्षी आणि प्राण्यांच्या मृत्यूसाठी उष्माघाताला जबाबदार धरत आहेत.

त्यांच्या मते, उन्हाळ्यात २६ एप्रिल रोजी सिंदेवाही वन परिक्षेत्रात वाघिणीचा मृत्यू उष्म ाघाताने झाला असावा. ३० मे रोजी ताडोबाच्या बफर झोनमधील पळसगाव वन परिक्षेत्रात पिपर्डा जवळ बछड्याच्या मृत्यूचेही कारण उष्माघातच सांगितले जाते. २४ मे रोजी गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा भागात सातशे वटवाघळांचा झालेला मृत्यू आणि ६ जून रोजी झरण वन परिक्षेत्रात मृतावस्थेत आढळलेला रानगवा या सगळ्यांच्या मृत्यूला वाढत्या उन्हाला जबाबदार धरले आहे. अर्थात काही तज्ज्ञ यास पूर्णत: सहमत नाहीत. तज्ज्ञा-तज्ज्ञांत मतभेद आहेत. काही वेगळी कारणे सांगतात, काही वेगळी.

वाघाला थंड वातावरण लागते. उन्हाळ्यात तो बरेचदा पाण्यात बसलेलाच दिसतो. त्यामुळे उन्हाळ्यामध्ये व्याघ्र प्रकल्पात वाघांचे दर्शन होते. सध्या जंगलातले तलावही आटत चालले आहेत. त्यामुळे वृद्ध वाघ आणि बछडे 'डिहायड्रेशन'ला बळी पडलेले असू शकतात, असे सांगितले जाते. वाढत्या उष्णतेमुळे पाण्याचे नैसर्गिक स्रोत आटतात. जंगलातील आगीचे प्रमाण वाढते. पाण्याचे; अन्नपाण्याचे चक्र विस्कळित होते. हे धोके आहेतच. वाघांचे मृत्यू उष्माघाताने झाले, की त्याची वेगळी कारणे आहेत हे सत्य पुढे येईलच. पण ते मृत्यू उन्हाळ्यात झाले आहेत, हेदेखील तेवढेच खरे आहे. याची वेळीच काळजी घेणे गरजेचे आहे.

उष्माघाताने माणसांचे बळी जात होते, त्यावेळी कुणी बोलत नव्हते. आता वन्यप्राण्यांवर ही वेळ आली तर झाली ओरड सुरू, असा आरोप वनप्रेमींवर होऊ शकतो. पण, ही वेळ कुणावरच येऊ नये. माणसांवर ती येऊ नये म्हणून दर वर्षी प्रशासन दुपारी १२ ते ४ कामकाजास सुटी द्या; या वेळात बाहेर पडू नका, असे आवाहन करते. पण ऐकतो कोण? तो मालक ज्याला ठरवून दिलेले काम वेळेत करायचे आहे, तो जबरदस्ती मजुरांच्या मागे लागून काम करून घेतो. तो मजूर ज्याचे पोट हातावर आहे, तो चार-दोन पैसे हाती अधिक मिळेल म्हणून तळपते ऊन अंगावर घेऊन काम करतो. शरीरातील पाणी कमी होते आणि मृत्यूची भीती अधिक वाढते. प्रशासनाचे नियम डावलून जे कुणी कामे करवून घेतात, त्यांना नोटीस देण्याखेरीज दुसरी गोष्ट कामगार मंत्रालयाच्यादेखील हातात नाही. उन्ह खूप तापते आहे हे खरंय. उद्या सावली हवी असेल तर आज झाडे लावावी लागतील. वाघांना ते शक्य नाही. माणसांना आहे. त्यांनी प्रयत्न करायला काय हरकत आहे.

**– अतुल पांडे**

# 'स्पा सेंटर्स' बनताहेत अनैतिक व्यवसायांचे अड्डे ?




मुंबई, नवी मुंबई तसेच पुण्यातील पिंपरी चिंचवड भागांसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये सध्या मसाज पार्लर आणि स्पा सेंटर यांचे पेव फुटले आहे. या व्यवसायाच्या आडून अनैतिक धंदे चालत असल्याची अनेक प्रकरणे एकामागोमाग एक उघड होऊ लागली आहेत. पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने मागील सहा महिन्यात मुंबई, नवी मुंबई, डोंबिवली तसेच पिंपरी चिंचवड भागात अनेक ठिकाणी धाडी टाकून स्पा सेंटर्सच्या नावाखाली वेश्या व्यवसाय चालवणाऱ्या रॅकेट्सचा पर्दाफाश केला आहे.

हे सेंटर्स चालवणाऱ्या मॅनेजर्सना अटक केली असून यामध्ये काम करणाऱ्या महिलांची सुटका करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड भागातील विमाननगर परिसरात फेब्रुवारी महिन्यात 'रूट स्पा सेंटर'वर पोलिसांनी छापा टाकला असता, कारवाईच्या भीतीने खिडकीतून उडी मारून पळण्याच्या प्रयत्नात एका महिलेने आपला जीव गमावला तर या सेंटरचा मॅनेजर गंभीर जखमी झाला. याच महिन्यात मुंबईतील गोवंडी येथील 'लेमन स्पा'मध्ये समाजसेवा शाखेने मोठी कारवाई करत लैंगिक तस्करीचे रॅकेट उद्ध्वस्त केले आणि चौघांवर गुन्हे दाखल केले.

एप्रिल महिन्यात 'स्पा पॅलेस' नावाच्या सेंटरवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने बनावट ग्राहक पाठवून धाड टाकली. येथून थायलंडच्या चार नागरिकांसह ७ महिलांची सुटका करण्यात आली. यंदाच्या मे महिन्यात पुण्यातील बकोरी फाटा येथील 'नाईन सेन्सेस स्पा' वर गुन्हे शाखेने छापा टाकून ५ तरुणींची सुटका केली आणि व्यवस्थापक महावीर ससाने याला अटक केली. तर पिंपरी चिंचवड परिसरातील बिबवेवाडी येथे मसाज सेंटरच्या नावाखाली चालणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करत २ महिलांची सुटका करण्यात आली आणि किरण अवदुते या मुख्य आरोपीला अटक करण्यात आली.

याच महिन्यात मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत डोंबिवली पूर्वेकडील स्पा सेंटरवर आणि ठाण्यातील एका हाय-प्रोफाईल स्पामध्ये पोलिसांनी धाड टाकून अनेक महिलांची सुटका केली तर याच मे महिन्यात मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांनी नायगाव परिसरातील स्पा सेंटरवर संयुक्त कारवाई करत एका महिला एजंटला अटक केली. जून महिना सुरु होऊन जेमतेम १० दिवस झाले आहेत.

या दहा दिवसांत पिंपरी चिंचवड भागातील हिंजवडीतील 'ब्ल्यू डायमंड रिलॅक्स स्पा' आणि वाकड परिसरातील स्पा सेंटरवर पोलिसांनी धाड टाकली. यात स्पा चालक मारुती मुरडे आणि मॅनेजर वैशाली चव्हाण यांच्यासह अनेकांना अटक करण्यात आली असून महिलांची सुटका करण्यात आली. तर वाशी येथील 'लगून स्पा सेंटर'वर पोलिसांनी छापा टाकून कथित देहव्यापाराचा पर्दाफाश केला. स्पा चालिका सविता जयस्वाल आणि व्यवस्थापकाला अटक करून महिलांची सुटका करण्यात आली. २०२६ मध्ये पिंपरी-चिंचवड आणि पुणे भागात १६ हून अधिक स्पा सेंटर्सवर छापेमारी करून ३८ हून अधिक आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर ३७ पेक्षा जास्त पीडित महिलांची सुटका करून त्यांची रवानगी सुधारगृहात करण्यात आली आहे. या केवळ राज्यात मागील ६ महिन्यांत घडलेल्या मोजक्या घटना आहेत. स्पा सेंटर्सच्या नावावर देशभरातील प्रमुख शहरांमध्ये सर्रासपणे अनैतिक व्यवसाय सुरु असल्याचे वर्तमानपत्रांतील बातम्यांवरून लक्षात येते.

स्पा सेंटर्सच्या नावाखाली चालणाऱ्या अनैतिक व्यावसायाच्या घटना एकामागोमाग एक उजेडात येत आहेत. मागील काही महिन्यांत स्पा सेंटरच्या आडून चालणाऱ्या अनैतिक धंद्याबाबतच्या अनेक तक्रारी दाखल झाल्याने स्पा सेंटर्स नक्की लोकांच्या त्वचेच्या आरोग्यासाठी आहेत की अनैतिक धंदे चालवण्यासाठी असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. स्पा सेंटर आणि मसाज पार्लर सारख्या गोंडस नावाखाली सर्वच शहरांमध्ये हे धंदे अव्याहतपणे सुरु आहेत. अनेक ठिकाणी हे सेंटर्स रात्री उशिरापर्यंत सुरु असतात.

तेथे चालणाऱ्या अवैध धंद्यामुळे स्थानिक नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. नागरिकांच्या तक्रारींच्या नंतर जागे होणाऱ्या पोलीस प्रशासनाला याबाबत खरंच काही ठाऊक नसते की हे सेंटर्स चालवणाऱ्या मालकांचे आणि आणि स्थानिक पोलिसांचे काही आर्थिक लागेबांधे असतात याबाबतही चौकशी केली जायला हवी. सर्वच स्पा सेंटर्स आणि मसाज पार्लरमध्ये अशा प्रकारच्या अनैतिक गोष्टी घडतात असे नाही; मात्र सध्या ज्या प्रमाणात एकामागोमाग एक घटना समोर येत आहेत त्यामुळे हे व्यवसाय प्रचंड बदनाम होऊ लागले आहेत हेही तितकेच सत्य आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# पाकव्याप्त काश्मीरमधील आंदोलनाचा भारताने फायदा घ्यावा

भारताचे तुकडे करून काश्मीरला स्वतंत्र राष्ट्र करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या पाकिस्तानचेच आणखी तुकडे होण्याची वेळ आली आहे असे म्हणावे लागेल कारण पाकिस्तानमधील बलुचिस्तान आणि सिंध प्रांतातील नागरिक पाकिस्तानच्या दडपलशाहीला कंटाळून पाकिस्तानमधून स्वतंत्र होण्यासाठी झटत असताना आता पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकही पाकिस्तानच्या दडपशाहीविरुद्ध रस्त्यावर उतरून आंदोलन करून पाकिस्तानातून अलग होऊन भारतात सामील होण्यासाठी आंदोलन करत आहेत. बलुचिस्तानला पाकिस्तानपासून स्वतंत्र करण्यासाठी बलुचिस्तान लिबरेशन आर्मी पाकिस्तानशी सशस्त्र लढा देत आहे. पाकिस्तान आर्मी आणि बलुचिस्तान लिबरेशन आर्मी यांच्यात सतत लढाई सुरू असते. सिंध प्रांतातील नागरिकही पाकिस्तानच्या दडपशाहीला कंटाळून रस्त्यावर उतरून पाकिस्तान सरकार विरुद्ध घोषणाबाजी करत स्वतंत्र सिंध राष्ट्राची मागणी करत असतात. आता पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिक तर थेट आम्ही भारतात सामील होऊ इच्छितो म्हणत रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. मागील काही काळापासून पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिक पाकिस्तान सरकारच्या दडपशाहीचा सामना करत आहेत. पाकिस्तान सरकार पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांकडे दुर्लक्ष करत असून येथील नागरिकांना पुरेशा प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देत नाही. पाकिस्तानमधील सरकार पाकव्याप्त काश्मीरमधील साधनसंपत्तीचे शोषण करत असून नागरिकांना कोणत्याही सुविधा देत नाही त्यामुळे तेथील नागरिकांमध्ये पाक सरकार विरुद्ध प्रचंड असंतोष होता. त्यात पाकव्याप्त काश्मीरमध्ये निर्मिती केल्या जाणाऱ्या विजेचे प्रचंड बिल पाकिस्तान सरकार इथल्याच नारिकांकडून वसूल करत असल्याने पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिक पाक सरकार विरुद्ध रस्त्यावर उतरले आहे. या आंदोलनाचे नेतृत्व जॉइंट अवामी ॲक्शन कमिटी ( जे ए ए सी ) ही संघटना करत आहे. पाकिस्तान या संघटनेला दहशतवादी संघटना म्हणत असली तरी या संघटनेत डॉक्टर, इंजिनिअर , वकील यासारखे उच्चशिक्षित लोक आहेत. ही संघटना आपल्या न्याय मागण्यांसाठी रस्त्यावर उतरल्या नंतर घाबरलेल्या पाकिस्तान सरकारने हे आंदोलन चिरडण्यासाठी केलेल्या गोळीबारात २० हून अधिक आंदोलकांचा बळी गेला आहे. अर्थात ही आकडेवारी पाकिस्तान सरकारची आहे. प्रत्यक्षात यापेक्षा अधिक लोकांचा बळी गेला असल्याची शक्यता पत्रकारांनी व्यक्त केली असून या गोळीबाराचा जगभरातून निषेध व्यक्त केला जात आहे. ब्रिटनमधील ५० संसद सदस्यांनी पाकव्याप्त काश्मीरमधील परिस्थिवर चिंता व्यक्त केली असून युरोपातील काही शहरात पाकिस्तानच्या अत्याचाराविरोधात निदर्शने करण्यात आली आहे.




भारतानेही पाकव्याप्त काश्मीरमधील परिस्थितीवर चिंता व्यक्त करत पाकव्याप्त काश्मीरमध्ये झालेल्या गोळीबाराला मानवी संहार असे म्हटले असून यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाने पाकिस्तानला जबाबदार धरावे अशी मागणी केली आहे. पाकिस्तानने मात्र नेहमीप्रमाणे या आंदोलनाला भारताची फूस असल्याचे म्हणत या आंदोलनासाठी भारताला जबाबदार धरले आहे. हे आंदोलन करणारी जे ए ए सी ही संघटना गद्दार असून या संघटनेला भारताकडून आर्थिक पाठबळ पुरवले जात असल्याचा आरोप पाकिस्तान सरकारने केला आहे.

अर्थात भारताने हा आरोप फेटाळला असून पाकिस्तानमधील नागरिक सरकार विरुद्ध रस्त्यावर का उतरत आहेत याचे आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला पाकिस्तान सरकारला भारताने दिला आहे. बलुचिस्तान, सिंध प्रांत आणि पाकव्याप्त काश्मीर मधील साधन संपत्तीचा पाकने वापर करून घेतला पण तेथील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवल्या नाहीत. तेथील नागरिकांवर सतत अन्याय अत्याचार केला. तेथील नागरिकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला. नागरिकांवर बळाचा वापर करून दडपशाही केली. तेथील नागरिकांचे जगणे मुश्किल केले. महागाई प्रचंड वाढवली. तेथील नागरिकांना एकवेळेचे पुरेसे अन्न मिळणे देखील मुश्किल झाले म्हणूनच पाकव्याप्त काश्मीरमधील या आंदोलनात आम्हाला एकवेळेचे अन्न देखील मिळत नाही. अन्नासाठी आम्ही भारतातही जाऊ शकतो असे दावे काही आंदोलकांनी केले.

काही आंदोलकांनी तर थेट भारतात सामील होण्याची मागणी केली. अर्थात भारताने या मागणीवर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही मात्र आज ना उद्या भारताला यावर बोलावेच लागेल. वास्तविक भारतासाठी ही सुवर्णसंधी आहे. पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांच्या या असंतोषाचा फायदा घेऊन भारताने पाकव्याप्त काश्मीर पाकिस्तानधून मुक्त करून भारताला जोडण्यासाठी प्रयत्न करावा अर्थात हे वाटते तितके सोपे नाही हे जरी मान्य केले तरी तरी यानिमित्ताने चालून आलेली ही संधी भारताने साधायला हवी हे ही तितकेच खरे आहे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

### हवामान खाते

कसे हवामान खाते
जमाडी गंम्मत करते
खट्याळ ते घड्याळ
आकडे उलटे फिरते

हवामान कोरडे राही
अंदाजजोशात वर्तते
ओथंबूनि येतात ढग
आभाळास येतेभरते

पाऊस येणार कळते
छत्र्यांची जत्रा निघते
पांढरे फटाक ढग ते
मिश्किल चेष्टा बघते

सुटणारं वादळी वारे
अंदाज पत्रक भलते
हवा घेतोयं पंख्यानी
फांदी जरा ना हलते

अधे मधे हाय अलर्ट
कुठेहीकाही न घडते
चुकूनदुर्लक्षसुचनेला
पुरते गणित बिघडते

भुकंप बसवतो हादरे
रिश्टरस्केलधडधडते
सिस्मोग्राफ मशीनरी
काही बाही बडबडते

**– बबन दामोदर गुळवे**
**लातूर मो.९७३०९३९७३२**

# अमिर खान तिसऱ्यांदा विवाह बंधनात अडकणार

चित्रपटातील हिरो आणि हिरोईन यांच्या विवाहाबद्दल सर्वांना कुतूहल असते. त्याच पार्श्वभुमीवर नवीन जोडी लग्नाच्या बेडीत अडकणार असल्याचे समोर आले आहे. बॉलीवूडस्टार आमिर खान वयाच्या ६१ व्या वर्षी त्याची गर्लफ्रेंड गौरी स्प्रॅटसोबत ५ जुलै रोजी तिसरे लग्न करणार आहे. या वृत्ताला खुद्द आमिर खानने दुजोरा दिल्याचे वृत्त आहे. त्यामुळे अमीर खान आणि गौरी स्प्रॅट विवाह बंधनात अडकणार हे जवळपास निश्चित झाले आहे हे लग्न मुंबईतील त्याच्या निवासस्थानी अत्यंत साध्या पद्धतीने होणार आहे. गौरी स्प्रॅट ही मूळची बंगळुरूची असून ती एक उद्योजिका आहे. ती 'आमिर खान प्रॉडक्शन' या निर्मिती संस्थेमध्येही काम करते. आमिर खानचे हे तिसरे लग्न आहे. यापूर्वी त्याने रीना दत्ता यांच्याशी १९८६ मध्ये लग्न केले होते. त्यानंतर २००५ मध्ये त्याने दिग्दर्शक किरण राव यांच्याशी दुसरा विवाह केला होता. २०२१ मध्ये किरण राव यांच्याशी घटस्फोट झाल्यानंतर, तो आता गौरी स्प्रॅटसोबत आयुष्याची नवी सुरुवात करत आहे हा विवाह सोहळा छोटेखानी काही मोजक्याच लोकांच्या उपस्थितीत राहत्या घरी नोंदणी पद्धतीने होणारं आहे आमिरची होणारी बायको हि मुळची बंगळुरूची आहे. ४६ वर्षीय गौरी स्प्रॅट ही ब्युटी, फॅशन आणि वेलनेस क्षेत्रातील एक यशस्वी बिझनेसवुमन आहे. गौरीचं ह्या आधी एक लग्न झालं आहे आणि ६ वर्षाची तिला मुलगी सुद्धा आहे. अमिर खान आणि गौरी ह्याची ओळख हि फार जुनी आहे. पण मध्ये काही कारणास्तव दोघांमध्ये वाद झाले होते.

त्यामुळे खूप काळ ते एकमेकांच्या संपर्कात नव्हते. पण दोन वर्षांपूर्वी आमिरची चुलत बहीण नुझहत हिच्या मध्यस्थीने हे दोघे पुन्हा एकत्र आले. आधी मैत्री झाली आणि मग मैत्रीचं रूपांतर प्रेमात झालं आणि आता ते विवाहात होणारं आमिर खानने घेतलेल्या ह्या निर्णयाला त्याच्या चाहत्यांनी सकारात्मक प्रतिसाथ दिल्याचे समोर आले आहे.

**– राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## रेल्वेच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू; राजुरा वनपरिक्षेत्रातील नलफडी बिटातील घटना



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.११, राजुरा (चंद्रपूर) : राजुरा वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या नियत क्षेत्र नलफडी येथील कक्ष क्रमांक १७९ मधून गेलेल्या बल्लारशाह- काजीपेठ रेल्वे डाऊन लाईन, पोल क्रमांक १५५/ ४१ जवळ ९ जून रोजी रात्री सुमारे ८.१५ वाजण्याच्या सुमारास एका तीन महिन्याच्या बिबट्याचा रेल्वेची धडक बसून मृत्यू झाला.

रेल्वे कर्मचाऱ्यांकडून घटनेची माहिती प्राप्त होताच वन विभागाच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी भेट देवून पंचनामा केला. या ठिकाणाचे जीपीएस स्थान नोंदविण्यात आले आहे. मृत बिबट्याच्या बछड्याचा शरीराची तपासणी करण्यात आली असता त्याची लांबी ५१ सेमी, शेपटीची लांबी ३१ सेमी, मागील व समोरील पायांची लांबी प्रत्येकी १६ सेमी तसेच छातीचा घेर २६ सेमीअसा आढळून आला. शवविच्छेदनासाठी संबंधिक अधिकाऱ्यांमार्फत प्रक्रिया राबविण्यात आली. या बछड्याचे शवविच्छेदन पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ.एन.पी. तेलंगे यांच्यामार्फत करण्यात आले. तेयानंतर वनविभागाच्या नियमांनुसार व उपस्थित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दहन करण्यात आले. प्राथमिक तपासणी व शवविच्छेदन अहवालानुसार या बछड्याला रेल्वे गाडीच्या जोरदार धडकेत गंभीर दुखापत झाली व त्यातून निर्माण झालेल्या न्यूरोलॉजिकल शॉकमुळे त्याचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

बल्लारशाह ते काजीपेठ हा मध्य दक्षिण रेल्वे मार्ग राजुरा तालुक्यातील घनदाट जंगलातून जातो. या जंगलात वाघ, बिबट, अस्वल आदी वन्यजीव मोठ्या प्रमाणात आहेत. परंतु, वनभ्रमंती करतीना वन्यप्राण्यांना रेल्वे ट्रॅक वरुन ओलांडून जावे लागते. अशातच कळतनकळत रेल्वेची धडक बसून त्यांचा नाहक जीव जात आहेत. आत्तापर्यंत ११ पेक्षा अधिक वन्यजीवांचा रेल्वेच्या धडकेत जीव गेला आहे. घटना घडली की, रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांची यावर उपाययोजना करण्यासाठी बैठक होते. परंतु प्रत्यक्षात मात्र अंमलबजावणी होताना दिसून येत नाही. या रेल्वे मार्गावर तात्काळ उपाययोजना करण्याकरीता वनविभागाने पुढाकार घेऊन तसा प्रस्ताव राज्य व केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी मागणी नैसर्गिक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे.

## जालंदर ट्युशन क्लासच्या 'समर कॅम्प'चा थाटात समारोप

अक्षराज : दिवाकर घेर



दि.११, नागपूर : भानेगाव-खापरखेडा परिसरातील नाम ांकित जालंदर ट्युशन क्ल ासच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एका म हिन्याच्या विशेष समर कॅम्पचा समारोप सोहळा १० जून बुधवारला मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलागुणांनी उपस्थितांची मने जिंकली. या दिमाखदार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक शिक्षिका गीता जालंदर होत्या. तर प्रमुख पाहुण्या म्हणून शिक्षिका शुभांगी बोन्डे, ज्ञानेश्वर बोन्डे, रुचिका माहुले, शिला जालंदर, अश्विनी अभ्यंकर, वैशाली निलमवार आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.मागील महिनाभर चाललेल्या या समर कॅम्पमध्ये चिमुकल्या विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

निरोप समारंभाच्या या प्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध मनोरंजक खेळ आणि बहारदार डान्सचे सादरीकरण केले. चिमुकल्यांचा उत्साह पाहून उपस्थित पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे कौतुक केले व संपूर्ण कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंदाचा आस्वाद घेतला.समर कॅम्पमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आणि विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी पुरस्कार मिळताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद ओसंडून वाहत होता. समर कॅम्पचे मुख्य आकर्षण म्हणजे पालकांची लाभलेली लक्षणीय उपस्थिती आपल्या पाल्यांमधील सकारात्मक बदल आणि त्यांच्या कलागुणांचे सादरीकरण पाहून पालकांनी जालंदर ट्युशन क्लासच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.कार्यक्रमाची सुरुवात जालंदर ट्युशन क्लासच्या संचालिका अर्पिता सुनील जालंदर यांनी प्रास्ताविकातून केली. गेल्या महिनाभराच्या समर कॅम्पमधील विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला व उपस्थित सर्व पालक व मान्यवरांचे आभार मानले. अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात हा समारोप सोहळा संपन्न झाला.

## धनोजे कुणबी समाज बाबुपेठ शाखेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा संपन्न



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.११, चंद्रपूर : धनोजे कुणबी सम ाज बाबुपेठ शाखेच्या वतीने महादेव मंदिर येथे गुणवंत गौरव सम्मान सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि मोठ्या दिम ाखात संपन्न झाला. कार्यक्रमाचे उदघाटक धनोजे कुणबी समाज चंद्रपूरचे उपाध्यक्ष संजयढवस यांनी उपस्थित विद्यार्थी आणि पालक यांना मोलाचे मार्गदर्शन केले. समाजातील गुणवंतांचा गौरव करणे म्हणजे केवळ व्यक्तींचा सन्मान नव्हे, तर परिश्रम, जिद्द आणि यशाचा गौरव होय. जीवनातील कठीण आव्हाने पेलताना गुणवत्तेचा टिकाव लागतो. गुणवत्तेसाठी संधी, संस्कार आणि प्रोत्साहनाची आवश्यकता असते. अशा उपक्रमांमुळे युवक-युवतींना प्रेरणा मिळते, समाजात सकारात्मक विचार रुजतात आणि पुढील पिढीसाठी आदर्श निर्माण होतात, असे उद्घाटनपर भाषणात मनोगत व्यक्त केले. धनोजे कुणबी समाज लक्ष्मीनगरचे अध्यक्ष शीधरराव मालेकर यांनी अध्यक्षीय भाषणात मत व्यक्त केले की, आजच्या स्पर्धेच्या युगात ज्ञानात्मक गुणवत्तेला महत्व प्राप्त झाले आहे. सुजाण, सक्षम व सुसंस्कारीत पिढी घडविण्यासाठी शिक्षण संस्था ज्ञानाची उर्जापिठे म्हणून काम करीत असतात.

याप्रसंगी विचारपिठावर प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त मुख्यध्यापक रमेश पायपरे, प्रा रविंद्र झाडे, प्रभाताई वासाडे, संध्याताई गोहोकार, बाबुपेठ शाखेचे अध्यक्ष मुकेश गाडगे, यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंगेश देरकर, अमोल मत्ते, नरेंद्र सातपुते, संदीप मुसळे, मंगेश बतकी, साईनाथ उपरे, हरिदास पिंगे, सचिन ढेंगळे, बंडू देरकर, अविनाश हिंगाने, दिलीप पायपरे, शीकांत पिंपळशेंडे, शैलेश ताजने, गजानन उलमाले, रविंद्र वनसिंगे, जयशी वनसिंगे, अश्विनी पिंपळशेंडे, उज्वला मुसळे, शीतल मोडक, पुष्पलता मत्ते, सुषमा देरकर, मीनाक्षी बदकी, शीतल सातपुते, शोभा उपरे, सुहासिनी देरकर, किसन पिंगे, संगीता देरकर, सविता चोखारे, दीपाली कोल्हे, संगीता ढवस, अर्चना हिंगाने, जया वाघुळदे, मनीषा पायपरे, प्रियंका कोल्हे, माधुरी साळवे यांनी प्रयत्न केले व या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलावर गोळीबार प्रकरणातील आरोपींना नेरळ पोलीसांनी केले गजाआड

अक्षराज : जयेश जाधव

दि.११, कर्जत (रायगड) : नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील जांभूळवाडी येथे एका अल्पवयीन मुलाला बंदुकीच्या गोळीचे छर्रे लागून जखमी झाल्याप्रकरणी नेरळ पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून बेकायदेशीरपणे वापरण्यात आलेल्या दोन ठासणीच्या बंदुका जप्त केल्या आहेत.याप्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ जून रोजी हेमंत रामदास सराई हा अल्पवयीन मुलगा घराबाहेर खेळत असताना जंगलातील प्राण्यांच्या शिकारीसाठी अज्ञात व्यक्तीने बंदुकीतून गोळीबार केला. त्यावेळी गोळीतील छरे हेमंतच्या दोन्ही मांड्या, हात तसेच चेहऱ्यावर लागल्याने तो जखमी झाला. त्याला तातडीने उल्हासनगर येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल वरोटे यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाला तपासाचे आदेश दिले.

पोलीस उपनिरीक्षक सुशील काजरोळकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तांत्रिक माहिती, गुप्त बातमीदार आणि स्थानिक माहितीच्या आधारे तपासाची चक्रे फिरवून आरोपींचा शोध घेतला.

तपासादरम्यान जांभूळवाडी येथील चंद्रकांत दाजी केवारी (वय २७), हर्याचीवाडी येथील कृष्णा जानू पादीर (वय २५) आणि मधुकर नामदेव सराई (वय २६) यांना अटक करण्यात आली. चौकशी दरम्यान त्यांच्याकडून गुन्ह्यातवापरण्यात आलेल्या दोन बेकायदेशीर विनापरवाना ठासणीच्या बंदुका जप्त करण्यात आल्या.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या तपासात पोलीस उपनिरीक्षक एस.एस.शेंबडे, आर. एन.वसावे तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलिस हवालदार राजाराम पिंगळे, महेश खंडागळे, सचिन वाघम रे, निलेश कोंडार, पो.अंमलदार राजेभाउ केकाण, आशु बेंद्रे विनोद वांगणेकर, कुशल काळेखे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महत्वाची भूमिका बजावली.

## महाबळेश्वरच्या हेरिटेज ग्रेड-१ गोल्फ कोर्समध्ये पर्यावरणाचा विध्वंस

अक्षराज : रियाज मुजावर

दि.११, महाबळेश्वर (सातारा) : केंद्रीय पर्यावरण संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित असलेल्या महाबळेश्वरम धील ऐतिहासिक व नैसर्गिक वारसा लाभलेल्या हेरिटेज ग्रेड-१ गोल्फ कोर्स परिसरात मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाची हानी झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

परवानगीचा गैरवापर करून वृक्षतोड, बेकायदेशीर स्तेनिर्मिती, जमिनीचे खोदकाम आणि अनधिकृत शेड उभारण्यात आल्याचे उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी डॉ. योगेश खरमाटे यांच्या प्रत्यक्ष पाहणीत समोर आले असून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

'द क्लब महाबळेश्वर'चे सचिव लेफ्टनंट कर्नल गौतम नंदी यांनी गोल्फ कोर्स मैदानाचे सपाटीकरण व गवत लागवडीसाठी तहसीलदार कार्यालयाकडून २० फेब्रुवारी २०२६ रोजी परवानगी घेतली होती. मात्र, या परवानगीच्या मर्यादेबाहेर जाऊन सिटी सर्व्हे क्रमांक ११७ व ११८ मधील क्षेत्रात जेसीबीच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर खोदकाम करण्यात आल्याचे आढळून आले. तपासादरम्यान वनसदृश्य परिसरातील अंजन, जांभूळ, पिसा, बोबडसा, कावळा आणि गेळा यांसारख्या हजारो वृक्षांची तोड करून ते जमिनीत गाडण्यात आल्याचे समोर आले. तसेच मातीचे मोठमोठे ढिगारे व कृत्रिम टेकड्या तयार करून अंतर्गत रस्त्यांचे जाळे निर्माण करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले.

याशिवाय वृक्षतोड झालेल्या ठिकाणी कोणतीही वैध परवानगी न घेता मोठ्या आकाराचे पत्र्याचे शेड उभारण्यात आले असून संपूर्ण गोल्फ कोर्स परिसर तारांच्या कुंपणाने वेढण्यात आला आहे.

या गंभीर प्रकाराबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर प्रांताधिकारी डॉ. योगेश खरमाटे यांनी घटनास्थळी तातडीने भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी तहसीलदार सचिन म स्के आणि महाबळेश्वर नगरपालिकेचे



वृक्ष अधिकारी हिवरे यांच्याकडे परवानगीच्या अटींबाबत विचारणा केली. परवानगीच्या चौकटीबाहेरील कामांची प्रशासनाला माहिती नसल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितल्यावर प्रांताधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. डॉ.खरमाटे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ पंचनामा करण्याचे निर्देश देत सुरू असलेली सर्व कामे त्वरित बंद करण्याचे आदेश दिले. तसेच परवानगीच्या अटींचा भंग झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे तोंडी निर्देशही दिले आहेत.

या संयुक्त पाहणीवेळी तहसीलदार सचिन मस्के, मुख्याधिकारी योगेश पाटील, तक्रारदार व बॉम्बे एन्व्हायरमेंट ॲक्शन ग्रुपचे चेअरमन अनिल पंडित, सूर्यकांत पांचाळ, वृक्ष अधिकारी हिवरे, सागर शिंदे, वन कर्मचारी लह राऊत, सुनील लांडगे, मुख्य लिपिक बबन जाधव, अमित माने यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**पर्यावरण प्रेमींमध्ये संताप !**

महाबळेश्वरसारख्या पर्यावरणदृष्ट्या अतिसंवेदनशील आणि जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या पर्यटनस्थळी हेरिटेज ग्रेड-१ दर्जाच्या जागेवर झालेल्या या कथित पर्यावरणीय विध्वंसामुळे पर्यावरण प्रेमी, स्थानिक नागरिक आणि सामाजिक संघटनांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. आता प्रशासनाच्या पंचनाम्यानंतर होणाऱ्या संभाव्य फौजदारी कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## टिटवी-पळसखेडा सिमेंट नाला बांध प्रकरण तापले; कार्यकारी अभियंत्यांच्या पाहणीनंतर उच्चस्तरीय चौकशीचे संकेत

अक्षराज : पुनम परदेशी

दि.११, सोयगाव (छ.संभाजीनगर) : टिटवी-पळसखेडा परिसरातील धरती आबा योजनेअंतर्गत डीपीसीमधून मंजूर झालेल्या सिमेंट नाला बांधाच्या काम ावरील वाद आता अधिकच तीव्र झाला आहे. कामाच्या गुणवत्तेबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित होत असताना वृत्तप्रसारानंतर संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.



नुकतेच कार्यकारी अभियंता बिडगर, कनिष्ठ अभियंता साक्षी राठोड आणि इंजिनिअर शिंपी यांनी संबंधित कामाची पाहणी केली. पाहणीदरम्यान विविध तांत्रिक बाबींची तपासणी करण्यात आली. यावेळी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे पदाधिकारी, स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थ म ोठ्या संख्येने उपस्थित होते.

समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पाहणीदरम्यान कामामध्ये अनेक अनियमितता निदर्शनास आणून देण्यात आल्या. बांधकामात वापरण्यात आलेल्या साहित्याचा दर्जा, पायाची खोली, काँक्रीटची गुणवत्ता आणि कामाची एकूण अंमलबजावणी याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. समितीने यासंदर्भातील छायाचित्रे व व्हिडिओ पुरावे अधिकाऱ्यांसमोर मांडल्याचे सांगितले.

विशेष म्हणजे, या पाहणीदरम्यान डी.वाय. घोंगरे आणि संबंधित ठेकेदार उपस्थित नसल्याची बाब चर्चे चा विषय ठरली. यापूर्वी दूरध्वनीवर डी.वाय.घोंगरे यांनी मी चार वेळा कामाची पाहणी केली असून काम चांगल्या दर्जाचे आहे, असा दावा केला होता. मात्र प्रत्यक्ष पाहणीवेळी त्यांची अनुपस्थिती अनेक प्रश्न निम ाण करणारी ठरत असल्याची चर्चा उपस्थितांमध्ये होती.

दरम्यान, अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत यांनी कार्यकारी अभियंता बिडगर साहेब यांच्यासम ोर विविध मुद्दे मांडत कामाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. समितीच्या म्हणण्यानुसार, पाहणीदरम्यान संबंधित कामाचे मूळ इस्टिमेट अधिकाऱ्यांकडे उपलब्ध नसल्याचा मुद्दा ही उपस्थित करण्यात आला.

यावेळी कार्यकारी अभियंता बिडगर साहेब यांनी पदाधिकाऱ्यांशी चर्चा करत, या प्रकरणात प्राप्त झालेल्या आक्षेपांची नोंद घेण्यात येईल. आवश्यक त्या स्तरावर चौकशी करून वस्तुस्थिती तपासली जाईल, असे आश्वासन दिल्याचे समितीच्या प्रतिनिधींनी सांगितले. तसेच आठ दिवसांच्या आत चौकशी प्रक्रिया सुरू करण्याबाबत सकारात्म क भूमिका व्यक्त केल्याचा दावा करण्यात आला.

समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मात्र स्पष्ट इशारा देत सांगितले की, जर चौकशीला विलंब झाला किंवा प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाला, तर त्याची गंभीर दखल घेतली जाईल. आमच्याकडे पाहणीदरम्यानचे व्हिडिओ आणि इतर नोंदी उपलब्ध आहेत. त्यामुळे वस्तुस्थिती जनतेसम ोर आणली जाईल.

स्थानिक शेतकऱ्यांनी ही चिंता व्यक्त करत सांगितले की, येत्या पावसाळ्यात जर संबंधित बांधकाम ाला हानी पोहोचली तर त्याचा फटका परिसरातील शेती आणि आदिवासी बांधवांना बसू शकतो. त्यामुळे वेळेत तांत्रिक तपासणी करून आवश्यक निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची दखल घेऊन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्वतः स्थळ पाहणी करावी आणि आदिवासी भागातील विकासकामांबाबत निर्माण झालेल्या शंकांचे निरसन करावे, अशी मागणी ग्रामस्थ, शेतकरी आणि अखिल भारतीय भ्रष्टाचार निम ूलन संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

**चौकशीकडे सर्वांचे लक्ष !**

आता कार्यकारी अभियंत्यांच्या पाहणीनंतर प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेते, चौकशी कितपत निष्पक्ष होते आणि कामाच्या गुणवत्तेबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची उत्तरे मिळतात का, याकडे टिटवी-पळसखेडा परिसरासह संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. जर चौकशीत अनियमितता आढळून आल्या तर संबंधितांवर काय कारवाई होते, हेही तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे.

# कोराडीत घुमला 'जय श्रीराम'चा गजर; ६० महिला भाविकांची अयोध्या नगरीकडे रवाना

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.११, नागपूर :** जवळपास ५०० वर्षांच्या प्रतीक्षेनंतर प्रभू श्रीरामचंद्र भव्य मंदिरात विराजमान झाले आहेत. या अलौकिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी व प्रभू श्रीरामचंद्राचे 'याची देही, याची डोळा' दर्शन घेण्यासाठी कोराडी-खापरखेडा परिसरातील शेकडो महिला आतुर होत्या. महिला भगिनींची हीच तीव्र ओढ ओळखून श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडी ते प्रभू श्रीराम जन्मभूमी अयोध्या नगरी दर्शन वारी सोहळ्याचे भव्य आयोजन १० जून ते १३ जून पर्यंत करण्यात आले.भाजयुमोचे माजी जिल्हाध्यक्ष आशिष फुटाने यांच्या पुढाकाराने महिलांच्या भक्तीमय इच्छेची माहिती मिळताच राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रेचे नियोजन करण्यात आले. या विशेष अयोध्या यात्रेसाठी दोन वातानुकूलित स्लीपर कोच गाड्यांची व्यवस्था करण्यात आली. चार दिवसांच्या भक्तीमय प्रवासात महिला भाविकांना मुख्य श्रीराम मंदिरासोबतच अयोध्येतील इतरही अनेक पवित्र आणि ऐतिहासिक तीर्थक्षेत्रांच्या दर्शनाचा लाभ घेता येणार आहे. वारी सोहळ्याला ज्योती चंद्रशेखर बावनकुळे यांनी हिरवी झेंडी दाखविली. यावेळी महिलांचा उत्साह ओसंडून वाहत होता. कौसल्या सुत राम की जय, जय श्रीराम, सियावर रामचंद्र की जय अशा घोषणांनी कोराडी नगरी दणाणून गेली होती. या शुभप्रसंगी महिलांना शुभेच्छा देण्यासाठी महादुला नगराध्यक्ष हेमलता सावजी, राजेश रंगारी, नरेंद्र धनुले, अभिजित ढेंगरे, अभिजित तुरक, रवींद्र काळे, भूषण हिरे, आयुष परमार यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते व शेकडो रामभक्त उपस्थित होते.




शेकडो वर्षांनंतर प्रभू श्रीराम अयोध्या नगरीत परतले आहेत आमच्या भागातील माता-भगिनींना रामललाचे दर्शन घेता यावे हा आमचा मुख्य उद्देश होता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेबांच्या मार्गदर्शनामुळे आज हे स्वप्न पूर्ण झाले आहे.
**- आशिष फुटाने (माजी जिल्हाध्यक्ष, भाजयुमो)**

# पंढरपूरात तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगरसेवकांचा भाजप उमेदवार राऊत यांना पाठिंबा

## अनिल सावंत यांच्या नेतृत्वाखाली नगरसेवकांची पालक मंत्री गोरे यांचेशी भेट

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१०, पंढरपूर :** सोलापूर विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने पालकमंत्री जयकुमार गोरेयांनी शिवसेना शिंदे गटाचे नेते भगीरथ भालकेयांना जोरदार धोबीपछाड दिली आहे. भैरवनाथ शुगरचे चेअरमन व शिवसेना शिंदे गटाचे नेते अनिल सावंतयांच्या नेतृत्वाखाली तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या १२ पैकी ९ नगरसेवकांनी पालकमंत्री गोरे यांची भेट घेऊन महायुतीचे विधान परिषदेचे उमेदवार राजेंद्र राऊतयांना जाहीर पाठिंबा दिला आहे. अनिल सावंत यांच्या निवासस्थानी महायुतीची बैठक, भालके गैरहजरविधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने महायुतीची बैठक अनिल सावंत यांच्या निवासस्थानी आयोजित केली होती. या बैठकीला आमदार समाधान दादा अवताडे, माजी आमदार रामभाऊ सातपुते, जिल्हाध्यक्ष शशिकांत नाना चव्हाण, उमेदवार माजी आमदार राजेंद्र राऊत, मनसे नेतेदिलीप धोत्रे, प्रशांत गीड्डे, संतोष सुळे, श्याम गोगावआदी उपस्थित होते. मात्र, शिवसेना शिंदे गटाचे नेते भगीरथ भालके या बैठकीला गैरहजर होते. त्यामुळे त्यांची विधान परिषद निवडणुकीबाबतची भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही.



**'करेक्ट कार्यक्रम'** :- ९ नगरसेवक, १ अपक्ष भाजपासोबतमाजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचे पुतणे अनिल सावंत यांच्या नेतृत्वाखाली नगरसेवकनागेश काका भोसले, प्रसाद भैय्या कळसे, संजय बंदपट्टे, लोकेश यादव, अक्षय गंगेकर, नगरसेविका माधुरीताई धोत्रे, रुक्मिणीताई धोत्रे, साधना ताई धोत्रेआणि नगरसेविकाप्रणिता ताई घाडगेयांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपक्ष नगरसेवक ओंकार जोशीयांनी देखील भाजप उमेदवार राजेंद्र राऊत यांना पाठिंबा दिला. वाखरी गटाच्या जिल्हा परिषद सदस्यांच्या प्रतिनिधींनी ही पालकमंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेतली. पंढरपूर नगरपालिकेत तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे १२ नगरसेवक आहेत. १२ एप्रिल रोजी भगीरथ भालके आणि नगराध्यक्ष डॉ.प्रणिता ताई भालके यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता. त्यावेळी भालके यांनी पालकमंत्री गोरे यांच्यावर एकेरी भाषेत टीका केली होती. तसेच सर्व नगरसेवकांनी शिंदे गटात प्रवेश केल्याचे जाहीर केले होते. मात्र आज थेट ९ नगरसेवकांनी भाजपाला पाठिंबा दिल्याने भालके यांना मोठा धक्का बसला आहे.

**तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी महायुतीला पाठिंबा...**

पंढरपूर हे मोठे तीर्थक्षेत्र आहे. पंढरपूरच्या विकासासाठी आम्ही महायुतीच्या उमेदवाराला पाठिंबा दिला आहे, अशी प्रतिक्रिया तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे गटनेतेनागेश भोसलेयांनी दिली. दरम्यान, महाविकास आघाडीचे उमेदवारवसंतराव देशमुखहेच पंढरपूर पंचायत समिती सभापती निवडीत भाजपसोबत होते, त्यामुळे काय काय होतं ते कळेल, असे पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले. मतदान होईपर्यंत गोरे अजून किती धक्के देतात हे पाहावे लागेल.

# महावितरणाच्या ढिसाळ कारभाराविरोधात खासदार नरेश म्हस्के आक्रमक



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.११, नवी मुंबई :** महावितरण कार्यालयावर खासदार नरेश म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. ऐरोली आणि बेलापूर विधानसभा क्षेत्रातील रहिवाशांना गेल्या अनेक वर्षांपासून महावितरणाच्या ढिसाळ कारभाराचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सातत्याने वीजपुरवठा खंडित होणं, केबल जळण्याच्या घटना, ट्रान्सफॉर्मरमध्ये बिघाड होणं, कमी दाबाचा वीजपुरवठा, रखडलेली सबस्टेशनची कामे, वाढत्या तांत्रिक समस्या, तासंतास नागरिकांना अंधारात राहावे लागणं या समस्या वारंवार घडत आहेत. या गंभीर प्रश्नाकडे महावितरण प्रशासनाचं लक्ष वेधण्यासाठी आज शिवसेनेच्या वतीने ऐरोली आणि बेलापूर महावितरण कार्यालयावर खासदार नरेश म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आलं.

बेलापूर येथे युवासेना जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक अनिकेत रमाकांत म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले. यावेळी शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख अंकुश (बाबा) कदम, बेलापूर विधानसभा शहरप्रमुख किशोर पाटकर, नवी मुंबई महानगरपालिका गटनेते मनोज हळदणकर, ज्येष्ठ नेते तथा माजी उपमहापौर रमाकांत म्हात्रे, माजी उपमहापौर मंदाताई म्हात्रे, शिवसेना संघटक सरोजताई पाटील, महिला संघटक शितलताई कचरे, नेरुळ विभागप्रमुख विजय माने, ज्येष्ठ नेते अंकुश सोनवणे, युवासेना उपजिल्हाप्रमुख ममित भोईर, युवासेना ऐरोली विधानसभा शहरप्रमुख चेतन पाटील, नगरसेविका अनिता मानवतकर, नगरसेविका चैताली पाटील, समाजसेवक भावेश पाटील, सुरेश मानवतकर यांच्यासह शिवसेना-युवासेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ऐरोली येथे गटनेते मनोज हळदणकर यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी संपर्कप्रमुख अंकुश कदम, नगरसेविका व प्रभाग समिती अध्यक्षा हेमांगी सोनवणे, ऐश्वर्या सोनवणे, वैशाली पाटील, पूजा पाटील, आकाश मढवी, राजू पाटील, अंकुश सोनवणे, गगनदीपसिंग कोहली तसेच सर्व पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. नवी मुंबई हे देशातील एक नियोजित आणि आधुनिक शहर म्हणून ओळखले जाते. मात्र आजही नागरिकांना वीजेची समस्या जाणवत आहे. वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, महिला वर्गाला त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच वातावरणीय बदलामुळे भयंकर उकाड्याने रहिवाशांचा जीव कासाविस होत आहे. या गंभीर प्रश्नाची दखल खासदार नरेश म्हस्के यांनी घेतली. स्वत: खासदार नरेश म्हस्के यांनी या आंदोलनात सहभागी होत अधिकाऱ्यांना जाब विचारला. यानंतर शिवसेनेच्या आक्रमक भूमिकेमुळे महावितरण अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना करण्याचं आश्वासन दिलं.

नवी मुंबईसाठी स्वतंत्र केबल्स नागपूर आणि सिंधुदुर्ग येथून मागविण्यात आल्या असून चुकीचे काम करणाऱ्या संबंधित ठेकेदारांवर कठोर कारवाई केली जाईल, तसेच नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे कामही प्राधान्याने हाती घेण्यात येणार असल्याचं अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं. आम्ही सत्ताधारी असलो तरी जनतेच्या प्रश्नांबाबत कोणतीही तडजोड करणार नाही. नागरिकांना दर्जेदार आणि अखंड वीजपुरवठा मिळालाच पाहिजे, ही आमची भूमिका आहे. येत्या काळातही समस्या कायम राहिल्यास अधिकाऱ्यांना कार्यालयात बसू देणार नाही, असा स्पष्ट आणि कठोर इशाराही यावेळी खासदार नरेश म्हस्के यांनी दिला.यावेळी महावितरण प्रशासनाला निवेदन सादर करून नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्याची मागणी करण्यात आली.

# नैसर्गिक शेती करून आरोग्याची काळजी घ्यावी - डॉ. कांताप्पा खोत

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.११, पंढरपूर :** रासायनिक औषधांशिवाय शुद्ध अन्न पिकवून नैसर्गिक शेतीद्वारे स्वत:चे व कुटुंबाचे आरोग्य जपा, असे आवाहन आत्मा, सोलापूरचे प्रकल्प संचालक डॉ. के. बी. खोत यांनी केले. पुळुज येथे गुरुवारी आयोजित नैसर्गिक शेती महिला शेतकरी शेतीशाळा वर्गात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.


डॉ. खोत यांनी नैसर्गिक शेतीचे महत्त्व विषद करताना सांगितले की, मानवी आरोग्याला घातक असणाऱ्या रासायनिक औषधांशिवाय शुद्ध अन्न निर्मिती, जमिनीची सुपीकता वाढवणे, उत्पादन खर्च कमी करून शेतकऱ्याला स्वावलंबी बनवणे आणि पर्यावरण रक्षण करणे हे नैसर्गिक शेतीचे मुख्य उद्देश आहेत. नैसर्गिक निविष्ठा निर्मिती करून जमिनीतील कर्ब वाढवावा आणि एक एकर क्षेत्र नैसर्गिक पद्धतीने पिकवून दैनंदिन जीवनात आरोग्य सुधारावे.

प्रमुख मार्गदर्शक डॉ. स्वाती कदम, विषयतज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, मोहोळ यांनी जीवामृत, आच्छादन (Mulching), वाफसा, मिश्र पिके याविषयी सविस्तर माहिती दिली. बीज उगवण क्षमता, बीज प्रक्रिया यावर प्रात्यक्षिक घेऊन बियाणे निवड व खतांचा संतुलित वापर याविषयी मार्गदर्शन केले. मंडळ कृषी अधिकारी सचिन जाधव यांनी कृषी विभागातील विविध योजनांची माहिती दिली. योगेश पवार यांनी स्वागत करून शेतीशाळेचे महत्त्व व पिकाच्या कोणत्या अवस्थेत शाळा घ्यावी याचे मार्गदर्शन केले. या शेतीशाळेला महिला शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होत्या. यावेळी उपकृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, आत्माचे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, कृषी सहाय्यक माळी मॅडम, कृषी व्यवस्थापक जाधव, कृषी सखी संध्या पांढरे, सुजाता होनकळस, मोनिका सावंत, पशु सखी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# थोडक्यात

## आरटीओ कार्यालयांकडून मराठी माणसांची अडवणूक परप्रांतीयांना मात्र दाखल्यांमध्ये मुभा !


महाराष्ट्र शासन
तहसील कार्यालय : ठाणे, जिल्हा : ठाणे
जा. क्रमांक : 416561438178
दिनांक : 07 जून 2026
रहिवास प्रमाणपत्र
प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती संचित राजु म्हात्रे राहणार मोजे (गाव / शहर) रूम नं-103,साई कृपा सोसायटी,प्लॉट नं-0061,सेक्टर-20,बेलापुर नवी मुंबई (महानगरपालिका.), तालुका ठाणे, जिल्हा ठाणे येथील रहिवासी आहेत.
स्थळ : ठाणे
दिनांक : 07 जून 2026
(With the seal of Office)
Digitally signed by Dattatray Arvind Borde
Printed By -OMTID : VLE Name :PALLAVI RAKESH BHARNUKE, Date:07/06/2026 7:53PM

**अक्षराज : गणेश जाधव,**

**दि.११, नेरूळ (नवी मुंबई) :** २०१७ पासून आता पर्यंत लाखो परप्रांतियांना बनावट कागदपत्राद्वारे रिक्षा बॅच परमिट देण्यात आल्याची चर्चा चालू असताना, आता या चुकीच्या धोरणामुळे मराठी माणसांची गळचेपी चालू आहे.

रिक्षा टॅक्सी बॅच साठी, लायसन्स हे आरटीओ कार्यालय देते, पोलीस एनओसी, स्थानिक पोलीस स्टेशन व कमिशनर ऑफीस देते, स्थानिक रहीवासी दाखले तहसीलदार देतात. हे सरळ सरळ असताना, आता नवीन सादर केलेले दाखले,नवी मुंबई आरटीओ कार्यालय स्विकारत नाही.

तसेच जे दाखले सादर केले जातायतं त्यांचे रितसर ऑनलाईन कन्फ़र्मेशन ही निघत आहे. तरीही ते दाखले आरटीओ कार्यालय स्विकारत नाही हे विषेश,

याबद्दल परिवहन विभागातील संबंधित अधिकारी यांना विचारणा केल्यास आमचा तहसीलदार ठाणे जिल्हा यांच्याशी पत्र व्यवहार चालू आहे. त्यांच्याकडून उत्तर आल्यानंतर आपणास कळवू अशा प्रकारची उत्तरे देण्यात येत आहेत.

मग हिच अडवणूक पाठीमागेच कराय पाहीजे होती,म्हणजे कमीतकमी परप्रांतीयांची अनधिकृत घुसखोरी तरी झाली नसती, या बाबत परिवहन विभागाने आवर्जून मराठी रिक्षा चालकांची अडवणूक करणे थांबवावे,असा सुर सामान्य रिक्षा चांलकांच्या बोलण्यातून निघत आहे.

## सृजन मराठी साहित्य परिषदेच्या नागपूर विभागीय समन्वयकपदी अॅड.भूपेश पाटील यांची निवड



**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.११, चिमूर (चंद्रपूर) :** मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या सृजन मराठी साहित्य परिषद, महाराष्ट्र राज्य या राज्यव्यापी साहित्यिक चळवळीने महाराष्ट्रातील विविध विभागांसाठी विभागीय समन्वयकांची नियुक्ती जाहीर केली आहे. साहित्यिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, नवोदित लेखकांना मंच उपलब्ध करून देणे आणि राज्यभरातील साहित्यप्रेमींना एकत्रित जोडणे हा या नियुक्त्यांचा मुख्य उद्देश आहे. परिषदेच्या राज्यस्तरीय समन्वय फोरमच्या सभेत नागपूर विभागीय समन्वयकपदी चंद्रपूर जिल्ह्यातील प्रसिद्ध साहित्यिक अॅड.भूपेश पाटील यांची निवड करण्यात आली आहे. अॅड.भूपेश पाटील यांचेकडे नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यांची जबाबदारी देण्यात आली आहे.

सृजन मराठी साहित्य परिषद राज्यभर साहित्य, संस्कृती आणि सृजनशीलतेची व्यापक चळवळ उभी करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. नव्या समन्वयकांच्या नेतृत्वाखाली विविध साहित्यिक उपक्रम, कवी संमेलने, कथाकथन, चर्चासत्रे, वाचन चळवळ आणि सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहेत.

राज्यातील सर्व साहित्यिक, कवी, लेखक, पत्रकार, वाचक आणि मराठी भाषाप्रेमींनी या साहित्यिक चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवावा,असे आवाहन नागपूर विभागीय समन्वयक ऍड. भूपेश पाटील यांनी केले आहे.

## परभणी शहर आणि चारठाणा येथे अपर तहसील कार्यालयाला मंजुरी



**अक्षराज : अलीम शेख**

**दि.११, चारठाणा (परभणी) :** महसुली कामकाजातील दिरंगाई दूर करून नागरिकांना अधिक सुलभ व जलद सेवा देण्यासाठी परभणी शहर आणि चारठाणा येथे नवीन अपर तहसीलदार कार्यालय स्थापन करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. यासंदर्भात महसूल विभागाचे सहसचिव अजित देशमुख यांच्या स्वाक्षरीने आदेश जारी करण्यात आला आहे.

परभणी जिल्ह्यात महसुली कामकाजाचा वाढता व्याप लक्षात घेऊन नवीन अपर तहसीलदार पद निर्माण करून ही कार्यालये सुरू करण्यात येणार आहेत. परभणी शहरातील अपर तहसीलदार कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात परभणी शहर व परभणी महसूल मंडळाचा समावेश असेल. तर चारठाणा येथील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात चारठाणा, वाडी, पिंपळी, जांब, टाकळी कुंभकर्ण, देऊळगाव, सिंगणापूर आदी महसूल मंडळांचा समावेश करण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे नागरिकांना महसुली कामांसाठी परभणी किंवा इतर ठिकाणी वारंवार फेऱ्या माराव्या लागणार नाहीत. तसेच विविध दाखले, जमिनीच्या नोंदी, फेरफार व इतर प्रशासकीय कामे अधिक जलदगतीने पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

दरम्यान, जिंतूर तालुक्यातील बोरी येथे तहसील कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव अद्याप प्रलंबित असून त्यास शासनाची अंतिम मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे बोरी परिसरातील नागरिकांना तहसील कार्यालयासाठी आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे.

नवीन अपर तहसीलदार कार्यालयांच्या स्थापनेमुळे परभणी जिल्ह्यातील महसुली प्रशासन अधिक सक्षम होऊन नागरिकांना त्यांच्या परिसरातच शासकीय सेवा उपलब्ध होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.